# भारतीय जनता पक्ष

(केंद्रिय कार्यालय)

11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001

फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787


**'सुशासन संकल्प, भाजप विकल्प' च्या घोषणेसह निवडणुक व्यूहरचना घडवण्यासाठी नवी दिल्लीत भाजपाची राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक**

*भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री मुख्तार अब्बास नक्वी यांचे प्रसिद्धिसाठीचे वक्तव्य*

नवी दिल्लीः भारतीय जनता पक्षाची राष्ट्रीय परिषद आणि राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक नवी दिल्ली येथे एक मार्च रोजी आयोजित करण्यात आली असून ती तीन दिवस चालणार आहे.

भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री मुख्तार अब्बास नक्वी यांनी ही माहिती देताना सांगितले की, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री राजनाथ सिंह यांच्या मार्गदर्शनाने बैठक सुरु होईल. बैठकीत देशाची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय बाबींवर चर्चा-विमर्श केला जाईल.

श्री नक्वी यांनी आणखी पुढे सांगितले की, राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक चार सत्रात आणि राष्ट्रीय परिषदेची बैठक ही नउ सत्रात होईल. 'सुशासन संकल्प,भाजप विकल्प' च्या घोषणेसह या बैठकीत लोकसभेच्या आगामी निवडणुकीची व्यूहरचना घडवली जाईल.

राष्ट्रीय परिषद आणि राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीत देशाची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थिती तसेच देशासमोर भविष्यातील आव्हानांबद्दल विचार-विमर्श करण्यात येईल. याव्यतिरिक्त भ्रष्टाचार, घोटाळे,महागाई,आंतरिक सुरक्षा,राष्ट्रीय सुरक्षा,अंत्योदय आणि सुशासन विषयी पण चर्चा करण्यात येईल.

राष्ट्रीय परिषद आणि राष्ट्रीय कार्यकारिणीचे सर्व सदस्य तसेच लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार, विधानसभा सदस्य, राज्यातील पदाधिकारी, विविध मोर्चाचे राष्ट्रीय संयोजक, सर्व जिल्हा प्रमुख, महामंत्री, भाजपचे महापौर, जिल्हा पंचायत अध्यक्ष, संघटन मंत्री या बैठकीत सहभागी होतील. कार्यकारिणी बैठक ही नवी दिल्लीतील एनएमडीसी सेंटर तसेच राष्ट्रीय परिषद बैठक तालकटोरा इंडोअर स्टेडियम मध्ये आयोजित करण्यात आली आहे.

(ओ.पी.कोहली)

हेडक्वार्टर इन्चार्ज